# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ (०२०) २५६५६२३४ फॅक्स (०२०) २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/जादा वेतन-माहिती/२०१८/ ३३५ दिनांक : 19 JAN 2019

**परिपत्रक :**

**विषय : कनिष्ठ कर्मचारी त्यांना वरिष्ठ असलेल्या कर्मचा-यांपेक्षा जादा वेतन घेत आहेत, अशा कर्मचा-यांची माहिती सादर करणेबाबत..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक पीएवाय १०८२/सीआर-११००/(एक)/ एसईआर-३, दिनांक ०६/११/१९८४.

(२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९, अधिसूचना क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२/०४/२००९.

(३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेपुर १२१०/प्र.क्र.१२४(भाग-१)/सेवा-९, दिनांक ०९/०२/२०१६.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती नंतर / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर / पदन्नती मिळाल्यानंतर / सरळसेवेने नेमणूक झाल्यानंतर काही कनिष्ठ असलेले कर्मचारी त्यांना वरिष्ठ असलेल्या कर्मचा-यांपेक्षा जादा वेतन घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा आपल्या संस्थेत / कार्यालयात कनिष्ठ असलेले कर्मचारी त्यांना वरिष्ठ असलेल्या कर्मचा-यांपेक्षा जादा वेतन घेत असल्याचे निदर्शनास आले असल्यास (आगाऊ वेतन वाढी, विशेष वेतन वगळून) अशा गट क मधील कर्मचा-यांची माहिती / प्रकरणे खाली नमूद केलेल्या प्रपत्रामध्ये या कार्यालयास त्वरित सादर करावीत. जेणेकरुन सदर वेतनामध्ये असलेली तफावत दूर होऊन वेतनामध्ये नियमितता येईल व भविष्यात निर्माण होणा-या त्रुटींची पूर्तता वेळीच करणे शक्य होईल.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | पदावरील नियुक्तीचा दिनांक | दिनांक ०१/०१/२००६ रोजीचे / नियमित पदोन्नतीनंतरचे / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतरचे मूळ वेतन (ग्रेड वेतनासह)व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (८) |
| | | | | | |

तरी सदरची माहिती वेतन निश्चितीच्या आदेशांसह व संबंधित कर्मचा-यांच्या मूळ सेवा पुस्तकातील नोंदींच्या साक्षांकित छायांकित प्रतींसह या कार्यालयास सादर करावी, सदरबाबत माहिती निरंक असल्यास तसेही कळविणे.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

(२) या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

C:\Documents and Settings\admin1\My Documents\Pay Scale.docx\11